संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५३९/२०२४
सरकार/दिनदयाल
<u>नि.क्र.१२ खाली</u>

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची साक्ष</u>

<u>मी शपथेवर सांगतो कि,</u>
नाव – अजिमूल्लाखान शमिउल्लाखान पठान
वय – ५६ वर्ष
धंदा – ऑटो चालक,
राहणार – जलालखेडा, ता. नरखेड जि. नागपूर

<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कु.एस.एस.गांगावणे यांच्या मार्फत.</u>

१. मी आरोपीला ओळखत नाही. पोलिसांनी मला दि. १७.०५.२०२४ पंच म्हणून बोलविण्यासाठी लेखी नोटीस दिला नव्हता . मी पोलिसांसोबत घटनास्थळ पंच म्हणून कोठेही गेलो नव्हतो. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नव्हता. आता साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. सहीला ओळखीपूरता **नि.क्र.१३** देण्यात येते. त्यातील मजकुर मला माहिती नाही. पोलिसांनी माझे बयान नोंदविले नव्हते.

**(साक्षिदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विशेष सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाला साक्षीदाराला उलट तपासामध्ये विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणने खरे नाही की, दि. १७.०५.२०२४ रोजी मी पोलिसांसोबत मौजा बस स्टॉप जलालखेडा येथे पंच म्हणून गेलो होतो. हे म्हणने खरे नाही की, आरोपी हा त्याचा ऑटो क्र. एम.एच/४०/बी.एच./०६४५ हा दारुच्या नशेत चालवितांना पोलिसांना मिळून आला होता. हे म्हणने खरे नाही की, मला घटनास्थळी आरोपीच्या तोंडून दारुचा

उग्र वास येत होता. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने दारुच्या नशेत त्याचे वाहन चालवून वाहतूकीस अडथळा निर्माण केला होता. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व त्यावर वाचून मी सही केली. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दूसरा पंच म्हणून राजू चवरे हजर होता. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझे बयान नोंदविले होते. हे म्हणने खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.यु.एन.घोरपडे मार्फत.**

**उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत** | **समक्ष**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक –१४.०२.२०२५**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)